सोमवार, दि. १५ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ११२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

तालुका पोलीस ठाण्यातील अधिकारी मानसिंग बहुरे यांच्यावर दादागिरी व अवैध वसुलीचे गंभीर आरोप

## हॉटेल चालकाची पोलीस अधीक्षकांकडे तक्रार; चौकशी व निलंबनाची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस अधिकारी मानसिंग बहुरे यांच्यावर दादागिरी, अधिकारांचा गैरवापर व अवैध वसुलीचे गंभीर आरोप करण्यात आले असून, याप्रकरणी हॉटेल चालक सुरेश गुलगे यांनी थेट पोलीस अधीक्षक, जालना यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या प्रकारामुळे पोलीस खात्याच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून व्यापारी वर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

तक्रारीनुसार, मंठा रोडवरील अशोक ढाबा या हॉटेलमध्ये कोणतीही लेखी तक्रार, नोटीस किंवा कायदेशीर प्रक्रिया न पाळता पोलीस अधिकारी मानसिंग बहुरे वारंवार भेट देत असून, चढ्या आवाजात बोलणे, धमक्या देणे व मानसिक दबाव टाकणे असे प्रकार सातत्याने करत असल्याचा आरोप आहे. संबंधित हॉटेलमध्ये केवळ भोजन सेवा दिली जाते, कोणत्याही प्रकारची दारू विक्री केली जात नसतानाही दारू विकण्याची परवानगी कोणी दिली? असे प्रश्न विचारून ग्राहकांसमोर बदनामी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, मंठा रोड परिसरात अनेक ठिकाणी छुप्या पद्धतीने अवैध दारू विक्री सुरू असल्याचे सर्वश्रुत असतानाही, त्या ठिकाणी कारवाई न करता कायदेशीर व्यवसाय करणाऱ्या हॉटेल चालकावरच दबाव टाकण्यात येत असल्याचा आरोप आहे. यामुळे संबंधित पोलीस अधिकारी अवैध दारू विक्रेत्यांकडून दरमहा 'भरणा' वसूल करत असल्याचा गंभीर संशय निर्माण झाला असून, हा प्रकार अत्यंत धक्कादायक असल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे.

या संपूर्ण प्रकाराम ुळे पोलीस यंत्रणेवरील नागरिकांचा विश्वास डळमळीत होत असल्याचे चित्र आहे. जर पोलीस अधिकारीच कायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांना त्रास देत असतील, तर सामान्य नागरिकांनी न्यायासाठी कुणाकडे जावे? असा सवाल तक्रारीत उपस्थित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर सुरेश गुलगे यांनी पोलीस अधीक्षकांकडे पुढील ठोस म ागण्या केल्या आहेत- पोलीस अधिकारी मानसिंग बहुरे यांच्या विरोधातील आरोपांची स्वतंत्र व निष्पक्ष विभागीय चौकशी करण्यात यावी. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. मंठा रोड परिसरातील अवैध दारू विक्री व कथित वसुली प्रकरणाची विशेष तपास पथकाद्वारे चौकशी करण्यात यावी. कायदेशीर व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना पोलीस त्रासापासून संरक्षण देण्यात यावे.

दरम्यान, या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने व कायदेशीर पातळीवर दाद मागण्याचा इशाराही तक्रारदाराने दिला आहे. आता पोलीस प्रशासन या प्रकरणावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## दिव्यांग व्यक्ती समाजाची खरी ताकद

भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे



**जालना । प्रतिनिधी -** जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जालना शहरातील दिव्यांग बांधवांचा आज दि.१४ डिसेंबर रोजी चित्रकुट निवासस्थानी सन्मान पूर्वक हार घालून व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी संवाद साधताना भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे म्हणाले की, दिव्यांग व्यक्ती या समाजाची खरी ताकद आहेत. शारीरिक अडचणी असूनही त्यांनी जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाच्या बळावर जीवनातील अनेक आव्हाने समर्थपणे पेललेली आहेत. दिव्यांग व्यक्तींमध्ये असलेले कौशल्य, सकारात्मक दृष्टिकोन व संघर्षाची तयारी समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांना योग्य सन्मान, संधी व समान वागणूक मिळाल्यास ते समाजाच्या सर्वांगीण प्रगतीत मोलाचे योगदान देतील. दिव्यांगांचा सन्मान म्हणजे मानवी मूल्यांचा सन्म ान असल्याचेही भास्कर आबा दानवे यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष श्री. सिद्धीविनायक मुळे, श्री. धनराज काबलिये, प्रा. कपिल दहेकर, जीवन सले, सुनील राठी, प्रा. राजेंद्र भोसले, देविदास देशमुख, राजेश जोशी, प्रविण म ेहता, बाबासाहेब उगले, अजित मानधने, कल्याण भदनेकर, अमन मित्तल, गणेश खरात, रमेश गोगडे, राजेश देसार, निलेश गवळी तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भारताचा दणदणीत विजय

**दुबई -** आशिया कप अंडर १९ स्पर्धा सध्या दुबईच्या आयसीसी क्रिकेट अकादमीत सुरु आहे. भारतानं या साम न्यात पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवला आहे. आयुष म्हात्रेच्या टीम इंडियानं ही कमाल करुन दाखवली आहे. भारतानं प्रथम फलंदाजी करताना २४० धावा केल्या होत्या. या पाकिस्तानचा संघ या धावसंख्येचा पाठलाग करु शकला नाही. पाकिस्तानचा संघ १५० धावांवर बाद झाल्यानं भारतानं ही मॅच ९० धावांनी जिंकली. भारतानं प्रथम फलंदाजी करताना २४० धावा केल्या होत्या. वैभव सूर्यवंशी फलंदाजीत अपयशी ठरला.

## महायुती झाली तर ठीक अन्यथा शिवसेनेशी युती - अरविंदराव चव्हाण

चंदनझीरा, दु:खी नगर, माळीपुरा, प्रभागात रा. काँ.ची झंझावात सभा; शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश

**जालना । प्रतिनिधी -** महानगरपालिकेच्या निवडणूक निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा) पक्षाच्या कॉर्नर सभांना मतदारांनी भरभरून प्रतिसाद देत शेकडो कार्यकर्त्यांनी उत्साहाच्या वातावरणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश घेतला आहे. प्रभाग क्र. (१० माळीपुरा), (प्रभाग क्र.११ दु:खी नगर), प्रभाग क्र. (१२ चंदनझिरा) आणि भागात शनिवार रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा झंजावत पहावयास मिळाला आहे.



जालना महानगरपालिका प्रभाग क्र. १२ चंदनझीरा येथे शनिवार रोजी आयोजित सभेमध्ये जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पाट (अजित दादा) चे जिल्हा अध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष म धुकरराव आर्दड, शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शेख मेहमूद, राष्ट्रवादी म हिला काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या शकुंतला ताई कदम, अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष शहा आलम खान, शहर जिल्हा कार्याध्यक्ष मिर्झा अनवर बेग, प्रा. सोपानराव तेलगड, प्रभाकर घेवन्दे, रिंकलताई तायड, सतीश वाहुळे, विजय सोनवणे, गणेश कावळे, पप्पू खान, इच्छुक उमेदवार हाजी गणी खान आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण म्हणाले राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सर्व समाज घटकाला सोबत घेऊन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार माणुसकीचा धर्म टिकवण्यासाठी समाजामध्ये समतेचे विचार रुजवत आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचार सर्वसामन्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पक्षाचा पुरेपूर प्रयत्न असल्याचे श्री चव्हाण यांनी सांगितले. महापालिकेत आपल्या भागाचा सर्वांगीण विकास करणाऱ्या आणि सर्वसामान्यांची प्रश्न समजून घेणाऱ्या हाजी गणी खान यांच्यासारख्या प्रामाणिक आणि विश्वासू व्यक्तीस ताकद द्या असे आवाहन त्यांनी केले. महापालिकेत महायुती झाली तर ठीक नाहीतर शिवसेना शिंदे गटाशी युती निश्चित असल्याचे श्री चव्हाण यांनी सांगितले. मान्यवरांनी आपल्या भाषणातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला बळकट करण्याचे आवाहन केले.( प्रभाग क्र.११ दु:खी नगर) येथे अजित प्रचार सभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष मधुकरराव आर्दड आपल्या भाषणातून पान २ वर

## प्रभाग क्र. ८ मध्ये क्रिकेट टूर्नामेंटच उद्घाटन

युवकांना व्यसनमुक्ती व तंदुरुस्त जीवनशैलीकडे वळवण्याचा उपक्रम





**जालना । प्रतिनिधी -** शहरी जीवनशैलीमुळे वाढत चाललेल्या आरोग्य समस्यांच्या पार्श्वभूमीवर युवकांना खेळाकडे, विशेषतः क्रिकेटसारख्या मैदानी खेळांकडे वळवणे ही काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने प्रभाग क्रमांक ८ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या भव्य क्रिकेट टूर्नामेंटचे उद्घाटन उत्साहात पार पडले.

या टूर्नामेंटचे आयोजन शहर प्रमुख दुर्गेशजी काठोठीवाले व शहर संघटक दिनेशजी भगत यांच्या वतीने करण्यात आले असून, उद्घाटन युवा सेना राज्य सचिव व युवा नेते अभिमन्युजी खोतकर तसेच युवा नेते अश्विनजी अंबेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी क्रिकेटसारख्या खेळाचे आरोग्यदृष्ट्या असलेले महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, नियमित खेळामुळे शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्फूर्ती, शिस्त, संघभावना व सकारात्मक जीवनशैली विकसित होते. मोबाईल, व्यसन व ताणतणावापासून युवकांना दूर ठेवण्यासाठी अशा क्रीडा स्पर्धा अत्यंत उपयुक्त ठरतात.

कार्यक्रमास शहर प्रमुख विष्णुजी पाचफुले, माजी शहर प्रमुख बाला परदेसी, गणेशजी तराशे, माजी शहर प्रमुख घनश्यामजी खाकीवाले, महेशजी दुसाने, कमलेशजी खरे, गोविंद सोनूने, माजी नगरसेवक नितीन जांगडे, माजी नगरसेवक नरेश खुदभैये, जीवन भगत, विक्की विजयसेनानी, सेवकराम नारीयलवाले, सुनिल नंद, मुकेश जांगडे, नंदलाल मेघावाले, मेघराज मेघावाले, रवि दंडाइत, हरिचंद मेघावाले, अजय भुरेवाल, विशेष भगत, नितेश त्रिबंके, मनोज राजपूत, हीरालाल गुरुदेव, बापू शिंदे, उमेश भुरेवाल, कुणाल अनलदास, रोहित भुरेवाल, योगेश देवावाले, सतपाल खाकीवाले, सतपाल काठोठीवाले, सुनिल भगत, अजय काठोठीवाले, मनोज धानुरे यांच्यासह अनेक क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी धिरज भगत, अभिमन्यु काठोठीवाले, राजेश कांबळे, सुनिल नंद, विक्रम काठोठीवाले, उमेश भुरेवाल, चेतन काठोठीवाले, नरेश भगत, जीवन भगत, विक्की विजयसेनानी यांनी विशेष परिश्रम घेतले.

ही स्पर्धा डी ॲण्ड डिके मित्र मंडळ यांच्या संयोजनाखाली आयोजित करण्यात आली असून, युवकांमध्ये खेळाची आवड वाढवणे, आरोग्याबाबत जागृती निर्माण करणे व सामाजिक सलोखा जपणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

अशा क्रीडा उपक्रमांमुळे परिसरातील युवकांना आपली ऊर्जा सकारात्मक दिशेने वापरण्याची संधी मिळत असून, खेळा आणि निरोगी रहा हा संदेश प्रभावीपणे पोहोचत असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## पण शेतकऱ्यांना मोबदला नाही

आमदार अर्जुन खोतकर यांची मागणी!

**नागपूर -** जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातून देशातील प्रमुख बाजारपेठांमध्ये मोसंबी, डाळिंब, द्राक्ष, कांदा, टोमॅटो व विविध भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असते. परंतु अमृतसर, लुधियाना, दिल्ली, लखनऊ, हैद्राबाद अशा बाजारपेठांमध्ये माल विक्री करूनही अनेक व्यापारी शेतकऱ्यांना देयक न देणे, मोबदला रोखणे, आर्थिक फसवणूक करणे ही चिंताजनक परिस्थिती गेल्या काही वर्षांत वाढत आहे.



या आर्थिक फसवणुकीमुळे आधीच कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना अत्यंत बिकट परिस्थितीला सामोरे जावे लागते, इतकेच नव्हे तर काही शेतकरी टोकाचे पाऊल उचलण्यासही मजबूर झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर आज नागपूर येथे सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशन २०२५ मध्ये आम दार अर्जुन खोतकर यांनी सभागृहात राज्य सरकारचे लक्ष वेधत महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी सूचना मांडल्या.

खोतकर यांनी केलेल्या प्रमुख सूचना :

देशभरातील प्रमुख बाजारपेठांम ध्ये 'शेतकरी सहायता केंद्र' स्थापन करावेत जिथे म हाराष्ट्रातून माल जातो अशा प्रत्येक मोठ्या शहरात शासनाचे *मदतकेंद्र कार्यालय* असावे, ज्याम ुळे फसवणुकीची तक्रार लगेच करता येईल, व्यापाऱ्यांची पडताळणी होईल, देयकांची हमी आणि ट्रॅकिंग राहील, शेतकऱ्यांना कायदेशीर संरक्षण मिळेल, शेतकऱ्यांसाठी 'शेतकरी भवन - निवासव्यवस्था' उभारणे, शेतकऱ्यांना बाहेरगावी राहताना मोठा पान २ वर

## संपादकीय पान

# पहिले गृहमंत्री

भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज ७५ वि पुण्यतिथी. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला. त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. वकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थांनचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

# संत साहित्याची वैज्ञानिकदृष्ट्या चिकित्सा व्हावी- डॉ. लहवितकर




**जालना । प्रतिनिधी -** संत साहित्याची वैज्ञानिकदृष्ट्या चिकित्सा व्हावी, महाराष्ट्रात संतपीठ कार्यान्वित व्हावेत, अशी अपेक्षा वारकरी संत साहित्य संमेलनाचे अध्यक्ष द्वाराचार्य डॉ रामकृष्ण महाराज लहवितकर यांनी आज( दि. १४) येथे व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या अनुदानातून जालना एज्युकेशन सोसायटीतर्फे जेईएस महाविद्यालयात आयोजित वारकरी संत साहित्य संमेलनाच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरूषोत्तम बगडिया हे होते. हभप प्रमोद महाराज जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी विचारपीठावर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. श्रीधर नांदेडकर, जालना एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्रीनिवास भक्कड,स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री,कार्यवाह डॉ. यशवंत सोनुने, हभप नाना महाराज पोखरीकर,हभप सोनुने गुरूजी, हभप अनिरुद्ध महाराज क्षीरसागर आदींची उपस्थिती होती

यावेळी बोलतांना डॉ. लहवितकर पुढे म्हणाले की, वारकऱ्यांचा धर्म हा व्यापक आहे, संत साहित्य व संत विचार हे मानव कल्याणाचा मार्ग दाखवतात, कीर्तन

हा मानवतेचा संस्कार आहे तर अभंग हे अनुभवाचे अविष्कार आहेत. अलिकडे समाजाला संत विचार जवळचे वाटू लागले आहेत, त्यामुळेच साहित्य क्षेत्रातही संताचा विचार होत आहे, ही आनंदाची बाब आहे. संत साहित्य कळण्यासाठी चिंतनाची नितांत गरज आहे.संत साहित्य हे सर्वांचे आहे, या साहित्याचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी धुरंधरांनी उचलावी. कीर्तनाचे आउटपुट नसले तरी कीर्तनकाराने संहितेप्रमाणे प्रबोधन करायला हवे, वारकरी कीर्तनकाराला अगोदर आपल्या राष्ट्रीयत्वाचे स्पष्ट भान असले पाहिजे, तरच त्याची विश्वात्मक भूमिका सार्थ ठरेल. कुटुंबवत्सलता, ग्रामएकात्मता, समाजशीलता आणि राष्ट्रीय एकात्मभावना कर्तव्यतत्परतेने जपत विश्वात्मक भूमिका अनुसरावी. आज प्रबोधनातूनच नव समाज निर्माण होईल, असा आशावाद व्यक्त करत ज्ञानभक्तीचा विचार जनसामान्यांपर्यंत पोहचवा, असे आवाहन त्यांनी केले. संत साहित्याची वैज्ञानिकदृष्ट्या चिकित्सा व्हावी,महाराष्ट्रात संतपीठ कार्यान्वित व्हावेत, अशी अपेक्षाही डॉ. लहवितकर यांनी व्यक्त केली.

यावेळी बोलतांना प्रा. श्रीधर नांदेडकर म्हणाले की, संत परंपरा ही आपल्याला नम्रता शिकवते, वारकरी संत साहित्य संमेलने ही मूल्य संस्कार देतात, संत साहित्याच्या प्रसार होण्यासाठी वारकरी संत साहित्य संमेलन महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी हभप डॉ. अनिरुद्ध महाराज क्षीरसागर यांनी संत पंरपरा हीच खरी परंपरा असून संताचे विचार अंगिकारले तरच मानव कल्याण होईल, असे सांगितले.

प्रास्ताविक करतांना स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ . गणेश अग्निहोत्री यांनी संतपीठांचे पुनर्रजिवन व्हावे, जालन्यात लोककला विद्यापीठ स्थापन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करीत वारकरी संत साहित्य संमेलन संमेलनासाठी सहकार्य करणाऱ्या मंडळींचे आभार मानले.

अध्यक्षीय समारोप करताना पुरूषोत्तम बगडिया यांनी जेईएस महाविद्यालयात समाजाला योग्य दिशा देणारे उपक्रम सातत्याने आयोजित केले जात असल्याचे सांगून वारकरी संत साहित्य संमेलनाच्या आयोजनामुळे संताचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहचण्यास मदत होईल, असे सांगितले.

यावेळी वारकरी संत साहित्य संमेलनाच्या वतीने नाना महाराज पोखरीकर, सोनुने गुरूजी, डॉ. अनिरुद्ध महाराज क्षीरसागर यांचा गौरव करण्यात आला. तसेच वारकरी संत साहित्य संमेलनासाठी सहकार्य केल्याबद्दल जनसेवा ग्रुपचे अध्यक्ष पुरूषोत्तम मोतीवाला, सचिव रामनारायण जैस्वाल, सदस्य सुदेश करवा, शाम लखोटिया यांचा विशेष गौरव करण्यात आला. समारोपीय सोहळ्याचे सूत्रसंचालन डॉ. बाबासाहेब वाघ यांनी केले तर संमेलनाचे कार्यवाह डॉ . यशवंत सोनुने यांनी आभार मानले.

यावेळी प्रा. बसवराज कोरे, डॉ. रावसाहेब ढवळे, ड. शिवाजी आदमाने, बाबुराव व्यवहारे, ड. सोपानराव भांदरगे, अरुण भोरे यांच्यासह वारकरी संत साहित्य संमेलनाचे पदाधिकारी वारकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# हल्लेखोर प्राण्यांचा सरकारला सुचक सल्ला; जंगल वाचवा अन्यथा गंभीर परिणाम

बिबट्या शहरात का येतो,याचा अभ्यास सरकारने कधी केला का?सरकारला आताच शेळ्या का आठवल्या? असे अनेक प्रश्न सध्याच्या परिस्थितीत उपस्थित होत आहे. सध्या राज्यभरात बिबट्याने मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे.नुकताच नागपूरात दिनांक १० तारखेला बिबट्याने ७ जणांना गंभीररित्या जखमी केले. त्यामुळे बिबट्याचे हल्ले रोखण्यासाठी जंगलात १ कोटी शेळ्या सोडण्याची घोषणा वनमंत्री गणेश नाईक यांनी केली.परंतु प्रश्न निर्माण होतो की एक कोटी शेळ्या येणार कोठुन आणि आपण कुत्रेच पकडु शकत नाहीत तर एक कोटी शेळ्या सोडल्याने सरकारला बिबटे सापडतील असे मला वाटत नाही आणि सापडले तर ठेवणार कोठे. कारण विधिमंडळ परिसरात रेड कार्पेटवर भटके कुत्रे बिनधास्त फिरत होते हे कुत्रे पकडण्यास मनपा कर्मचाऱ्यांनी भरपूर मेहनत घेतली पण कुत्रे पकडण्यात अपयश आले.त्यामुळे आपण कुत्रे पकडू शकत नाही तर बिबटे कसे काय पकडणार हाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आपण जंगल संपदा वाढविली असती आणि जंगल कटाई रोखली असती तर आपल्याला गावात किंवा शहरात बिबट्या किंवा हिंसक पशु दिसलेच नसते हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे बिबट्यासाठी शेळ्यांचा बळी आणि जंगलतोडीमुळे बिबट्याकडुन शेतकरी, शेतमजूर, गावातील नागरिक, शहरातील नागरिक, पाळीव प्राणी यांचा बळी हे कितपत योग्य म्हणावे! त्याकरिता सरकारने जंगल वाचविले तर सर्वांचाच जीव आपोआप वाचले व सुरक्षित राहील. पर्यावरण प्रेमी, सामाजिक संघटना, गावकरी,राज्यातील नागरिकांना आणि स्वतः निसर्ग जंगल तोडीचा कडाडून विरोध करीत आहेत.तरीही विकासाच्या नावावर किंवा धार्मिकतेच्या नावांवर मोठ्या प्रमाणात जंगलतोड व वृक्षांची कत्तल सुरूच आहे आणि हे संपूर्ण दृश्य सरकार, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. तरीही जंगल कटाई अजुन पर्यंत थांबलेली नाही.बिबट्या शहरात किंवा गावात धाव का घेत आहेत याची कल्पना सरकार आहे तरी शहरीकरण,औद्योगिकरण, धार्मिकतेच्या नावांवर मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढत आहे.आज राज्यातीलच नाही तर देशातील प्रत्येक शहरांचा विचार केला तर प्रत्येक शहराच्या मुख्य पॉईंट्स पासुन ४० किलोमीटर अंतरापर्यंत शहरीकरण व औद्योगिकरण झालेले आहे.आपण आपल्या सुखसुविधांसाठी जंगल तोडून शहरीकरण केले हे ठीक आहे.परंतु बिबट्या किंवा इतर प्राण्यांचा विचार सरकारने कधी केला का?की त्यांचे काय होईल?या मुक्या पशुपक्ष्यांना कोण अन्नपाणी देयील याचा विचार राज्यातील कोणत्याही सरकारने केलाच नाही.त्याचेच प्रायश्चित्त म्हणजे आज बिबट्यानी राज्यातील प्रत्येक शहरांमध्ये व गावांमध्ये धुमाकूळ घालत आहे.आज बिबट्या आपल्या अन्नासाठी शहरात येतो आणि सरकारला खडबडून जाग येतो, आणि सरकार म्हणते की बिबट्यांचा शहरातील हैदोस पहाता त्यांच्या खाद्यपुर्तीसाठी एक कोटी शेळ्या जंगलात सोडू. अहो तुम्ही वरच्यावर जंगल कापत रहाल तर शेळ्या कुठे सोडणार?आपण जर शेळ्या जंगलात सोडत असाल तर ही तर पाळीव प्राण्यांची हत्याच म्हणावी लागेल. आता शहरीकरण थांबायला तयार नाही, त्यामुळे सरकारने बिबट्यांना पाळीव प्राण्यांचा दर्जा दिला तर बरे होईल.कारण शेळ्या जंगलात सोडण्यापेक्षा आम्ही घरीच त्यांना जेवण देवू शकतो.सरकारने सर्वच गोष्टींचा गांभीर्याने विचार करने गरजेचे आहे.कारण देशासह राज्यात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे, बिबट्यांची संख्या वाढत आहे,कुत्र्यांची संख्या वाढत आहे यावर ठोस पाऊल उचलने गरजेचे आहे.सरकारने जर जंगल वाचविले तर बिबट्या किंवा अन्य हिंसक पशु यांना शेळ्यांची सुध्दा गरज भासणार नाही.सरकार चुकीचा अंदाज लावत आहे की बिबट्या शहरात किंवा गावात येतो.परंतु तसे अजीबात नाही कारण बिबट्या किंवा अन्य पशुपक्षी यांच्या घरांवर आपणच म्हणजे मानवजाती व मुख्यत्वे करून सरकारने अतिक्रमण केले आहे म्हणून बिबट्या सारखे अनेक हिंसक पशु शहराकडे किंवा गावाकडे धाव घेतांना दिसतात व यामुळे जीवीत हाणीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.यात बिबट्याचा काय दोष! बिबट्या हा आपली खाद्यपुर्तीसाठी शहरात येत आहे,म्हणून काय त्यांच्या खांद्यपुर्तीसाठी आपण शेळ्यांचा वापर करणार काय? म्हणजे एकाचा जीव वाचवण्यासाठी दुसऱ्याचा जीव घ्यायचा हा कुठला न्याय?ही हत्याच म्हणावी लागेल!त्यापेक्षा सरकारने जंगल कटाई व वृक्षतोड थांबविली तर बिबट्यांचेही प्राण वाचतील व शेळ्यांचा सुध्दा जीव वाचेल. सरकार साधुग्रामसाठी तपोवनातील १८०० झाडांची हत्या करण्याच्या तयारीत आहे.याचा पुढे नाशिककरांसाठी काय विपरीत परिणाम होईल हे आज राज्यातील अनेक भागात बिबट्या दाखवित आहे.त्यामुळे बिबट्यांची वाढती संख्या, जंगल कटाई आणि बिबट्यांच्या खाद्यपुर्तीसाठी शेळ्यांची पेशकस हे कितपत योग्य आहे याचा सरकारने गांभीर्याने विचार केला पाहिजे व संपूर्ण हिंसक पशुंचे वास्तव जंगलात कसे राहील याचा अभ्यास पुर्वक विचार सरकारने केला पाहिजे. कारण गेल्या काही वर्षांपासून बिबट्या शहरात व गावात येत आहे.याचेच प्रायश्चित्त म्हणून जंगलतोडीमुळे शेतकरी, गुराखी,पाळीव प्राणी यांची आतापर्यंत मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली आहे.सरकारने विचार करायला हवा की, मोजक्या बिबट्यासाठी एक कोटी शेळ्यांचा हत्या करायची हे कितपत योग्य म्हणावे.आपण वनसंरक्षक कायद्यानुसार जंगली पशुंना मारू शकत नाही.परंतु बिबट्यांचा शहरात व गावातील वाढता हैदोस पहाता सर्वसामान्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व वनविभागाने स्वीकारली पाहिजे.कारण कायदे बनविणारे सरकारच त्यामुळे सरकारने मानव, बिबट्या व शेळ्यांना वाचविण्याची जबाबदारी स्वीकारावी.फक्त तोंडी आश्वासन देवून चालणार नाही तर ठोस उपाययोजना केली पाहिजे.आपण कायद्यानुसार बिबट्यांला मारूही शकत नाही.त्यामुळे यावर सरकारजवळ एकच उपाय आहे तो म्हणजे जंगल वाचविणे.बिबट्यांना शेळ्या खाऊ घाला किंवा आणखी काही खाऊ घाला जोपर्यंत जंगलतोड थांबणार नाही तोपर्यंत हिंसक पशुंचे आक्रमक सुरूच राहील सावधान!

भिवापूर तालुक्यात वाघांचा मुक्त संचार सुरू असल्याचे गावकरी, शेतमजूर, गुराखी, सामान्य नागरिक सांगत आहेत.याकडे वनविभाग दुर्लक्ष करीत आहे असा भिवापूर वासीयांचा आरोप सुध्दा केला आहे.या गंभीर समस्येकडे भिवापूर तालुक्यातील खरेदी-विक्री संघाने वनमंत्री गणेश नाईक यांना निवेदन सुध्दा दिले आहे.यावरून स्पष्ट होते की हिंसक पशुंचा मुक्त संचार राज्यातील अनेक भागात,जिल्ह्यांत,गाव खेड्यात, शहरात सुरूच आहे.परंतु यावर वनविभागाने अजुन पर्यंत ठोस उपाययोजना केल्याचे दिसत नाही.हल्लेखोर प्राणी आता सरकारला सल्ला देत आहे की, आताही जंगल वाचवा.त्यामुळे वनविभाग व सरकारला आग्रहाची विनंती आहे की, आपल्याला हिंसक पशु पासुन जर सुरक्षित रहायचे असेल तर प्रथम जंगल संपदा वाढविली पाहिजे.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## पान १ वरुन

### महायुती झाली ...

म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार राज्याला सुजलाम, सुफलाम करण्याची भूमिका निभावत असताना सर्व समाज घटकाला न्याय देण्यासाठी विविध धोरणे आखीत आहेत. आणि विशेष करून मुस्लिम अल्पसंख्याकांचे हक्क आणि अधिकार अबाधित राहण्यासाठी श्री पवार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. जालना जिल्ह्यात शेख अन्सार यांच्यासारखे गरीब विद्याथ या भागात देखील असतील त्यांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणासाठी समाजाने मदत केली पाहिजे, शिक्षण घेण्यासाठी श्रीमंती लागत नाही ही बाब लक्षात ठेवणे गरजेचे असल्याचे श्री आर्दड यांनी सांगितले. प्रभाग क्र. (१० जामा मस्जिद माळीपुरा) येथे आयोजित सभेत बोलताना राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या शकुंतलाताई कदम म्हणाल्या की, स्व. शेख अख्तर यांचे सामाजिक कार्य विसरता येऊ शकत नाही. त्यांनी सर्व जाती धर्मातील लोकांना मदत आणि सेवा केलेली आहे. या भागातील नागरिक येत्या निवडणुकीत शेख मुजामिल यांना निश्चितपणे निवडून देतील असा विश्वास सौ .कदम यांनी यावेळी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहालम खान यांना नगरपालिकेतील कामाचा दांडगा अनुभव आहे. ते सातत्याने विजय झालेले आहेत त्यांची कामाची कार्यशैली सेवाभाव वृत्ती सर्वांना माहीत असल्यामुळे ते निश्चितपणे निवडून येतील. शहरातील आयोजित सभेच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पाट (अजित दादा) चे जिल्हा अध्यक्ष तथा माजी आ. अरविंद चव्हाण हे होते. या सभेत शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शेख मेहमूद अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा अध्यक्ष शहाआलम खान,शहर जिल्हा कार्याध्यक्ष मिर्झा अनवर बेग, प्रा. सोपानराव तेलगड, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे, महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्ष रिंकल ताई तायड, जिल्हाध्यक्ष सतीश वाहुळे, विजय सोनवणे, इच्छुक उमेदवार शाहआलम खान, शेख मुजमिल, गणी खान मोहम्मद इम्रान आदींनी यावेळी आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी शेख मोहसीन, संतोष निकाळजे, सय्यद जावेद अली, अर्शद मिर्झा, पप्पू खान, खालेद माशायक, सय्यद कासिम, नसीर खान हबीब खान,बबलू आतार ,फाईम आतार, आवेस खान, शेख अबरार, रवी बागल, शेख आमिर, शेख अर्शद, शेख सोहेल, शेख शोएब ,शेख समीर, शेख अलीम, शेख फिरोज, तालिब खान, आमेर आतार, जुनेद सय्यद, इरफान खान ,असेफ आतार, फरहान खान, शेख समीर आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

### पण शेतकऱ्यांना ...

आर्थिक ताण येतो. त्यासाठी अल्पदरात निवास, स्वच्छ शौचालय व अंघोळीची सुविधा, विश्रांती कक्ष, सुरक्षित तांत्रिक सहाय्य, वाहन तळ (Truck Parking Zone) निर्माण करणे, माल उतरवताना व व्यवहार पूर्ण होईपर्यंत ट्रक/पिकअप सुरक्षितपणे उभे राहावेत, CCTV व्यवस्थेसह सुरक्षित परिसर, पार्किंगचे योग्य नियोजन. राज्यांदरम्यान शासनाचा अधिकृत करार फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर तत्काळ कारवाई, मोबदल्याची हमी, देयक न देणाऱ्या व्यापाऱ्यांची ब्लॅकलिस्टिंग, शेतकऱ्यांसाठी 'वन-स्टॉप सपोर्ट सिस्टीम'

मंत्री जयकुमार रावल यांची प्रतिक्रिया पणन मंत्री श्री जयकुमार रावल यांनी सभागृहात खोतकर यांच्या सूचनांचे स्वागत करत स्पष्ट म्हटले शेतकऱ्यांचे संरक्षण ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे. या सर्व सूचनांवर सकारात्मक पावले तातडीने उचलली जातील.

आमदार अर्जुन खोतकर यांचे विधान

महाराष्ट्राचा माल देशभर जातो, पण आमचा शेतकरी मात्र फसवणुकीला बळी पडतो-हे सरकारला मान्य नाही.

शेतकरी देशभर सुरक्षितपणे व्यापार करू शकतील, मोबदला वेळेवर मिळेल आणि त्यांच्या प्रवासात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी मी आज ही ठोस मागणी केली.

या निर्णयाचा शेतकऱ्यांना होणारा थेट फायदा : बाहेरगावी माल विक्रीत १00% सुरक्षितता, देयक न मिळण्याची समस्या कमी, व्यवहाराची पारदर्शकता, निवास - पार्किंग - मदत एकाच ठिकाणी, फसवणूक करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई, महाराष्ट्र शासनाची थेट जबाबदारी हा पुढाकार देशभरातील शेतकऱ्यांसाठी आदर्श ठरणारा ठरेल.

जालना जिल्ह्याने ही मागणी पुढे रेटून देशव्यापी कृषी व्यापारात पारदर्शकता आणणारा नवा आदर्श निर्माण केला आहे.

# बुशरा अफसर कुरेशी सिरत क्वीझ स्पर्धेत तालुक्यातून सर्वप्रथम

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जमाते इस्लामी हिंद शाखा जाफराबाद यांच्या वतीने आयोजित जाफराबाद तालुका स्तरीय सिरत क्वीझ स्पर्धेचे आज जाफराबाद येथे बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालन्याचे जमाते इस्लामी हिंद से बशीर अहमद आश्फी तर तर प्रमुख पाहुणे म्हणून जमाते इस्लामी हिंद शाखा जालनाच्या अम्मारा फिरदौस, व मरियम जमिला यांची विशेष उपस्थित होती. कार्यक्रमाची सुरुवात कुराणपटनाने झाली त्यानंतर नात व प्रेषित मोहम्मद यांच्या जीवनीवर विद्यार्थ्यांनी भाषणं केली. नंतर मान्यवर प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांचे मार्गदर्शन केले. शेवटी आयोजित स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. या स्पर्धेत दोन गट अ आणि ब तयार करण्यात आले होते. पाचवी ते आठवी ब गट नववी ते बारावी अ गट. ब गटातून इ बी के उर्दू स्कूलची विद्यार्थिनी बुशरा अफसर कुरेशी हिने तालुक्यातून प्रथम क्रमांक मिळविला, दुसऱ्या क्रमांकावर नबीहा फातेमा बाखेर खान तर मोहम्मद उमर शेख रफिक याने तिसरा क्रमांक पटकावला. तसेच गटामध्ये फारीया सलीम बामिद्र हिने प्रथम क्रमांक, महरीन फैजानोदिन सिद्दीकी हीने द्वितीय लाईबा फिरदोस तहसीब खान हिने तृतीय क्रमांक पटकावला दोन्ही गटातील विजेता विद्यार्थ्यांना रोख बक्षीस प्रमाणपत्र तसेच सन्मानचिन्ह देण्यात आले. याव्यतिरिक्त या स्पर्धेत चांगले गुण मिळवणाऱ्या दहा विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षीस दिले गेले यामध्ये अरीबा साबेरोद्दीन शेख, सबा रहेमान कुरेशी, अलीना अमर पठाण, फारीया अहमद अली कुरेशी, आयेशा शेख कलीम, निदा फातिमा सय्यद अश्रफ, सय्यद सालेहा महरीन,अहमद शेख अशपाक, हुमेरा मोहीब सिद्दिकी, उमेमा मुजीब खान, आमना आसीम शेख, जारा महेक हुसेन कुरेशी, जिकरा जुबेर खान, पठाण रोमाना रिजवान खान या विद्यार्थिनींचा सहभाग आहे.

## मराठा महासंघाच्यावतीने प्रा. तेलगड यांचा सत्कार

# शिक्षणासह विविध क्षेत्रांत यशस्वी वाटचाल करण्याची दिशा देणारे व्यक्तिमत्व - अरविंद देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** गेली चार दशके शिव -फुले -शाहू-आंबेडकर या विचारधारेवर निष्ठा ठेवून सामाजिक कार्याची मशाल अखंड पेटवत ठेवणारे, जेईएस महाविद्यालयातून असंख्य विद्यार्थ्यांना घडवून त्यांना राजकारणासह विविध क्षेत्रांत यशस्वी वाटचाल करण्याची दिशा देणारे ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व समाजसेवक प्रा. डॉ. सोपानराव तेलगड यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित दादा पवार गट) शहरजिल्हा कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मराठा महासंघातर्फे शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. हा सत्कार त्यांच्या निवासस्थानी पार पडला.

यावेळी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव देशमुख, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक अशोक पडुळ पाटील, संभाजी ब्रिगेडचे माजी प्रदेश कार्याध्यक्ष भरतराव मानकर, कुणबी सेनेचे मराठवाडा संपर्कप्रमुख विष्णू कदम तसेच प्रा. तेलगट यांच्या पत्नी संजीवनीताई तेलगट उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना अरविंदराव देशमुख म्हणाले की, प्रा. डॉ. सोपानराव तेलगड हे केवळ प्राध्यापक नाहीत, तर पिढ्या घडवणारे सामाजिक शिल्पकार आहेत. जेईएस महाविद्यालयाच्या माध्यमातून त्यांनी असंख्य विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत सामाजिक भान दिले. राजकारण, प्रशासन, उद्योग, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत पोहोचलेले अनेक विद्यार्थी हीच त्यांच्या कार्याची साक्ष आहे. जालना शहरातील भाग्यनगर येथे मराठा सेवा संघाचा पाया उभारण्यापासून ते इमारत उभी करण्यापर्यंत आणि ग्रामीण भागातील मुलींसाठी वसतिगृह सुरू करण्यापर्यंतचे कार्य त्यांच्या दूरदृष्टीचे उदाहरण आहे. चळवळीतील अनेक कार्यकर्ते त्यांनी घडवले. कबड्डी खेळात स्वतः खेळाडू म्हणून तसेच मार्गदर्शक म्हणून अनेक खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय पातळीवर पोहोचवण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. आज समाजकारणाची भक्कम पायाभरणी आणि राजकारणाची सकारात्मक दिशा यांची सांगड घालणारे असे नेतृत्व पुढे येणे ही काळाची गरज आहे आणि प्रा. तेलगट हे त्याचे उत्तम प्रतीक आहेत.

यावेळी प्रा. डॉ. सोपानराव तेलगड म्हणाले की, सर्व समाजातील तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांच्या कौशल्यांची ओळख करून रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने मी राजकारणात प्रवेश केला आहे. मला कोणतीही निवडणूक लढवायची नाही; सत्तेच्या माध्यमातून सर्वांना सोबत घेऊन, समाजाच्या सहकार्याने काम करत राहायचे आहे.

सत्कार समारंभात उपस्थित मान्यवरांनी प्रा. तेलगड यांच्या सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा गौरव करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.



## ‘व्हॉईस ऑफ मीडियाच्या आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद

# सरकारने भूमिका घ्यावी तरच आंदोलन मागे - काळे

**नागपूर । प्रतिनिधी -** राज्यातील पत्रकार, डिजिटल माध्यमे, साप्ताहिक आणि रेडिओ या पत्रकार यांना भेडसावणाऱ्या गंभीर प्रश्नांबाबत ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ ‘तजच् इंटरनॅशनल फोरम’ च्या वतीने नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर नागपूर येथील यशवंतराव चव्हाण स्टेटियमवर जोरदार आंदोलन, उपोषण सुरू करण्यात आले आहे. पत्रकार आणि पत्रकारितेशी संबंधित ३३ मागण्यांवर तातडीची कार्यवाही करण्याची मागणी येथे करण्यात आली आहे. राज्यभरातील पत्रकारांनी जोरदार सहभाग नोंदविल्यामुळे हे आंदोलन यशस्वी झाले आहे. या ३३ मागण्यांमध्ये,पत्रकार महामंडळ तात्काळ कार्यान्वित करून किमान ३०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करावा. अनेक वर्षांपासून अडकलेल्या माध्यमांच्या शासकीय बिल तातडीने द्यावे. पाच वर्षांपासून दरवाढ न झाल्याने किमान २००% दरवाढ द्यावी. दैनिकांची २०२३-२०२४ पडताळणी व द्विवार्षिक पडताळणीवरील निर्णय १५ दिवसांत देऊन ऋठ काढावा. सर्व विभागांची दोन वर्षांपासून थकीत बिले ३० दिवसांत देण्याचे आदेश द्यावेत. माहिती विभागाच्या नियमावलीचे उल्लंघन करून इतर मार्गाने दिल्या जाणाऱ्या जाहिरातींवर कडक कारवाई करावी. सध्याच्या काळात ६०% नी कमी झालेल्या शासकीय जाहिराती पुन्हा वाढवाव्यात. सर्व मान्यताप्राप्त माध्यम संस्थांसाठी पत्रकारांचे किमान मासिक मानधन शासनाने निश्चित करून सक्तीने अंमलात आणावे. पत्रकार सुरक्षा कायदा सक्षम करून तात्काळ ऋखठ, जलद न्यायालये व संरक्षण यंत्रणा लागू करावी. जिल्हा व तालुका पातळीवर ‘पत्रकार संरक्षण अधिकारी’ नेमावेत. पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांसाठी १० लाख आरोग्य विमा व २५ लाख अपघात विमा लागू करावा. पत्रकारांसाठी स्वतंत्र निवृत्तीवेतन योजना सुरू करावी. सर्व गृहनिर्माण योजनांमध्ये पत्रकारांसाठी २% राखीव कोटा निश्चित करावा. जिल्हा प्रेस क्लबांना तांत्रिक सुविधा, इंटरनेट, प्रशिक्षणासाठी विशेष निधी द्यावा. जिल्हा माहिती कार्यालयांत ‘मीडिया सपोर्ट सेल’ स्थापन करावा. डिजिटल पत्रकारिता, तथ्य-जांच, कायदे व नवीन तंत्रज्ञानासाठी राज्यस्तरीय प्रशिक्षण अकादमी स्थापन करावी. डिजिटल न्यूज पोर्टल नोंदणी प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन व पारदर्शक पद्धतीने तातडीने सुरू करावी. शासनविरोधी बातम्यांमुळे नोंदविलेले बिनबुडाचे गुन्हे मागे घेण्यासाठी स्वतंत्र समिती नेमावी. दुर्घटना, आपत्ती व आजारांमध्ये अडचणीत सापडलेल्या पत्रकारांसाठी तातडीचा मदत निधी निर्माण करावा. महिला पत्रकारांसाठी सुरक्षित प्रवास, निवास सुविधा, मातृत्व रजा, क्रेच व लैंगिक छळ प्रतिबंध यंत्रणा बळकट करावी. राज्य, जिल्हा व राष्ट्रीय स्तरावरील पत्रकार सन्मान पुरस्कारांना आर्थिक स्वरूप देऊन ‘पत्रकार गौरव योजना’ सुरू करावी. जिल्हा माहिती अधिकारी व उपसंचालक पदे रिक्त असल्याने कामकाज ठप्प आहे; सर्व रिक्त पदे तातडीने भरावीत. जाहिरात धोरणात नियमित साप्ताहिकांना अग्रक्रम द्यावा. जाचक अटी शिथिल करून साप्ताहिक नियतकालिकांची परंपरा टिकून राहील, याची व्यवस्था करावी. दैनिक व साप्ताहिक माध्यमांमधील भेदभाव दूर करून, दैनिकांप्रमाणेच साप्ताहिक प्रतिनिधींनाही शासन-प्रशासनात समान सन्मान द्यावा. न्यूज पोर्टल, यूट्यूब न्यूज चॅनेल व इतर डिजिटल प्लॅटफॉर्मना अधिकृत वृत्त माध्यमाचा दर्जा द्यावा. डिजिटल पत्रकारितेसाठी स्वतंत्र व पारदर्शक नियमावली तयार करावी. जाहिरात धोरणात डिजिटल माध्यमांसाठी स्वतंत्र प्राधान्य निश्चित करावे. रेडिओमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना शासनाकडून अधिस्वीकृती व मान्यता द्यावी. केंद्र सरकारप्रमाणे राज्य सरकारकडूनही रेडिओ माध्यमांना जाहिराती वाढवाव्यात. पत्रकारांना मिळणाऱ्या सुविधा रेडिओ कर्मचाऱ्यांनाही मिळाव्यात. आर जे (निवेदक) म्हणून काम करणाऱ्यांना मालकांप्रमाणे इतर सुविधा व अधिकार द्यावेत. रेडिओ कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र पेन्शन योजना लागू करावी. अशा मागणीचाही समावेश करण्यात आला आहे. आज पहिल्या दिवशी उपोषण ठिकाणी नागपूर पोलीस आयुक्त, रविंद्र सिंगल,अतिरिक्त आयुक्त नवीनचंद रेड्डी यासह अनेकांनी भेट दिली.

**मुख्यमंत्री दूत ओमप्रकाश शेटे**

(अध्यक्ष, आयुष्मान भारत-मिशन महाराष्ट्र समिती) यांनी आंदोलनास भेट देवून शिष्टमंडळाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलणे करून दिले. पत्रकारांच्या अनुषंगाने ज्या काही मागण्या आहेत त्या मागण्या पूर्ण करण्यात येतील त्यासाठीच मुख्यमंत्री सन्माननिय देवेंद्र फडणवीस यांनी आपणास पाठवले आहे असे त्यांनी सांगितले. त्यांचेही भाषण झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे दूत म्हणून आ. हेमंत पाटील आणि आ. बाबुराव कोहळीकर यांनी उपोषणास भेट दिली. त्यांनी ही वरिष्ठ पदाधिकारी किशोर कारंजेकर, दिलीप घोरमारे, राहुल सावजी यांचे बोलणे करून दिले. या सर्वांची यावेळी भाषणे झाली. संदीप काळे (संस्थापक व आंतरराष्ट्रीय अध्यक्ष व्हॉईस ऑफ मीडिया) म्हणाले की, सरकार वेळ काढून नेत आहे. सरकारने योग्य ती भूमिका घ्यावी तरच आम्ही आंदोलन मागे घेतो, अनेक मागण्या मान्य सहतेने होवू शकतात पण सरकार करीत नाही.अनिल म्हस्के (महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष,व्हॉईस ऑफ मीडिया) यांनी राज्यातील सर्व जिल्हाध्यक्ष यांना विनंती केली आहे की, त्यांनी सक्रियपणे आंदोलनात सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# लोक अदालतीचा लाभ घेण्याचे ॲड. साजीदखान पठाण यांचे आवाहन, वकिलांची भूमिका महत्त्वाची

**जालना । प्रतिनिधी -** समाजातील सर्वसामान्यांनी जलद आणि परवडणाऱ्या न्यायप्रक्रियेसाठी राष्ट्रीय लोक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नोटरी संघटनेचे प्रवक्ता तथा विधी समितीवरील प्रसिद्ध विधिज्ञ ऍड. साजीदखान पठाण यांनी केले आहे. लोक अदालतीमुळे पक्षकारांना आपापसातील वाद सामोपचाराने मिटवून जलद न्याय मिळवता येतो, असे ते म्हणाले.

ॲड. पठाण यांनी राष्ट्रीय लोक अदालतीचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, लोक अदालत हे न्याय मिळवण्याचे एक प्रभावी आणि सोपे माध्यम आहे. येथे प्रलंबित खटले आणि दाखल न झालेले वादही सामंजस्याने सोडवले जातात. यामुळे न्यायालयांवरील कामाचा ताण कमी होतो आणि पक्षकारांचा वेळ व पैसा वाचतो. लोक अदालतीमध्ये झालेला निर्णय अंतिम असतो आणि त्यावर अपील करता येत नाही, ज्यामुळे वादाला कायमचा - पूर्णविराम मिळतो.

ते पुढे म्हणाले की, अनेकदा लोकांना वाटते की लोक अदालतीमध्ये वकिलांची गरज नसते, कारण ती एक अनौपचारिक प्रक्रिया आहे. मात्र, हे पूर्णपणे सत्य नाही. लोक अदालतीमध्येही वकिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. ऍड. पठाण यांनी वकिलांच्या आवश्यकतेवर भर देताना खालील मुद्दे मांडले: कायदेशीर

वकील पक्षकारांना त्यांच्या कायदेशीर हक्कांबद्दल आणि जबाबदाऱ्यांबद्दल योग्य माहिती देतात. प्रकरणाचे सादरीकरणः वकिलांमुळे पक्षकारांना आपले म्हणणे प्रभावीपणे मांडता येते आणि कायदेशीर बाजू स्पष्ट करता येते.

वाटाघाटी कौशल्ये, वकील दोन्ही पक्षांमध्ये सामंजस्य घडवून आणण्यासाठी आणि योग्य तोडगा काढण्यासाठी वाटाघाटीचे कौशल्य वापरतात. कायदेशीर दस्तऐवजः, समझोता कराराचे कायदेशीर स्वरूप आणि त्याचे परिणाम समजावून सांगणे तसेच योग्य कायदेशीर दस्तऐवज तयार करण्यात वकील मदत करतात. हक्कांचे संरक्षणः, पक्षकारांचे कायदेशीर हक्क सुरक्षित राहतील याची खात्री वकील करतात, जेणेकरून भविष्यात कोणतीही अडचण येऊ नये. प्रक्रियेची माहिती, लोक अदालतीची प्रक्रिया, नियम आणि कायदेशीर बारकावे वकिलांना माहीत असतात, ज्यामुळे पक्षकारांना योग्य दिशा मिळते. ऍड. पठाण यांनी शेवटी आवाहन केले की, न्याय मिळवण्यासाठी लोक अदालत हा एक उत्तम पर्याय आहे आणि या प्रक्रियेत वकिलांचे मार्गदर्शन घेतल्यास पक्षकारांना अधिक चांगला आणि सुरक्षित न्याय मिळू शकतो. त्यामुळे, नागरिकांनी लोक अदालतीचा लाभ घेताना अनुभवी वकिलांचा सल्ला अवश्य घ्यावा. असे आव्हान ऍड साजीदखान पठाण यांनी केले आहे.

१३ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. २०२५ वर्षातील ही शेवटची राष्ट्रीय लोक अदालत असेल.

मुख्य माहितीः तारीखः १३ डिसेंबर २०२५ (शनिवार).

या लोक अदालतीचा उद्देश प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे हा आहे, विशेषतः मोटर अपघात दावा प्रकरणे (चउढ), छ्ख कायद्याची प्रकरणे, पैसे वसुलीची प्रकरणे, कामगार विवाद, वीज आणि पाण्याच्या बिलांशी संबंधित प्रकरणे, वैवाहिक विवाद (घटस्फोट वगळून), आणि वाहतूक चालान यांसारखी तडजोड करण्यायोग्य फौजदारी प्रकरणे.

ही लोक अदालत देशभरातील विविध जिल्हा न्यायालये, उच्च न्यायालये आणि तालुका स्तरावर आयोजित केली जाईल. महाराष्ट्रासाठी विशेष सूचनाः* महाराष्ट्र वाहतूक पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, १३ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या लोक अदालतीदरम्यान प्रलंबित ई-चालान दंडाची कोणतीही तडजोड/सूट दिली जाणार नाही. नागरिकांना सल्ला देण्यात येत आहे की, त्यांनी सूट किंवा तडजोडीची सूचना देणाऱ्या सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नये.

दिल्लीतील तारखेत बदलः* दिल्लीत, १३ डिसेंबर हा नियमित कामकाजाचा दिवस जाहीर झाल्यामुळे, राष्ट्रीय लोक अदालतीची तारीख बदलून १० जानेवारी २०२६ करण्यात आली आहे.

तुमचे प्रकरण सूचीबद्ध करण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी, तुम्ही संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (DLS) किंवा राज्य विधी सेवा प्राधिकरण (SLS) च्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊ शकता असे आव्हान नोटरी संघटनेचे प्रवक्ता तथा विधी समितीवरील प्रसिद्ध विधिज्ञ पठाण साजीदखान यांनी केले आहे.

# आमदार आणि खासदार आणि पाच टक्के निधी खर्च करावा या मागणीसाठी धरणे आंदोलन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी दालनात विविध मागण्यांसाठी प्रहार दिव्यांग अपंग क्रांतीच्या आंदोलनाच्या वतीने प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांच्या आदेशाने दिव्यांगांनी ठिय्या आंदोलन केलं आहे. या धरणे आंदोलन दरम्यान जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू या जिल्हा अधिकारी कार्यालयापासून जिल्हा परिषद कडे जात असताना दिव्यांगांनी त्यांचा रस्ता अडोला आणि दोन तास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मेनू यांना जिल्हाधिकारी कार्यालयात थांबावं लागेल दिव्यांग जोरदार घोषणाबाजी सुरू केली आहे मिनू यांनी धरणे आंदोलनाला भेट द्यावी दिव्यांकाच्या भावना समजून घ्यावा या मागणीसाठी अंगरक्षक यांच्याकडे विनंती केली मात्र मिन्नू यांनी परत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे गेले आहे मात्र दिव्यांगाच्या प्रश्नाकडे मिनू यांनी दुर्लक्ष केले आहे आमदार आणि खासदार यांनी ५% किती खर्च करावा यासह विविध मागण्यांसाठी आज राज्यभरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रतिनिधी दिव्यांगांच्या मागण्या समजून घेण्यासाठी आले असताना मात्र दिव्यांगाना मान्य नसल्याने दिव्यांगांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालया शिरले आणि जिल्हाधिकारी अशिमा मात्तल यांची केबिन तोडण्याचा प्रयत्न केलाय मात्र पोलिसांनी समजूत काढत दिव्यांगांनी जिल्हाधिकारी कार्यालय केबिन समोर ठिय्या आंदोलन सुरू केले उपजिल्हाधिकारी हदगल यांनी दिव्यांगाच्या भावना समजून येत्या १९ डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजता जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात दिव्यांगाच्या मागण्या संदर्भात बैठक आयोजित करण्याचे आश्वासन दिले आहे आणि दिव्यांगांनी आपलं हे आंदोलन मागे घेतले आहे यावेळी जिल्हाध्यक्ष मोहण मुढे जिल्हाध्यक्ष रवींद्र अंभोरे सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे सतीश वाघ शकर शिरगुळे नरेश वाडेकर जावेद शेख अशोक नागवे बालु गोडे द्वारकाबाई गाडे संगीता बोंद्रे दिपाली गोरे राधाकिशन धोत्रे माऊली कदम सचिन शामराव कांबळे सत्यभान भोजने अर्जुन भुतकर हनुमान माने यशोदा लबासे शबाला शेख अनिता शिदे लता जोशी सविता बोराडे अल्ताफ मोमीन कृष्णा सुरासे राजेंद्र गाडेकर गोविंद कुरेशी फिरोज शेख नूर विजय ठोले सुनील निकाळजे पाडुरग येळवे शेख शेरखान पठाण ज्योती चव्हाण संगीता कोरडे भारत राठोड अशोक बोचरे विश्वनाथ सुरुग सुरेश निरमाडे विजय भवर अशोक जमदाडे राम चव्हाण बाळु आगलावे नागराज अंबिलवादे रंगनाथ शिंदे विलास कांबळे विठ्ठल चव्हाण गोविंद चिखले अनिल महापुरे रवी तायडे शाहरुख शहा आदींची उपस्थिती होती

### प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या जिपच्या मुख्य कार्यकारी मिन्नु यांची बदलीची मागणी

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिव्यांगाचे ठिय्या आंदोलन सुरू असताना अंगरक्षक का मार्फत मिनू यांनी दिव्यांगाच्या आंदोलनात भेट देण्याची विनंती केली होती मात्र त्यांनी परत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे रवाना झाले आहे दिव्यांगाचे प्रश्नाकडे दुर्लक्ष करणाऱ्या जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिनु यांची बदली करा दिव्यांग बांधवांनी केली आहे

**एकोणावीस तारखेच्या बैठकीला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे - मोहन मुंडे** धरणे आदोलाना दरम्यान उपजिल्हाधिकारी हदगल यांनी दिव्यांगाना येत्या १९ डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजता जिल्हाधिकारी अश्विनी मित्तल यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात दिव्यांगाची बैठक आयोजित करण्यात आली आहे या बैठकीला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्रार अपंग क्रांती आंदोलन जिल्हाध्यक्ष मोहन मुंडे यांनी केले आहे.



पान ४ वरुन

## महाराष्ट्राच्या अमृत ...

अवघ्या सव्वा तासात शक्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**पुनर्विकासाला गती**

शहरी पुनर्विकासाला गती देताना बीडीडी चाळ, जीटीपी नगर, बांद्रा रिक्लमेशन, आदर्श नगर, मोतीलाल नगर आणि एसव्हीपी नगर अशा विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पुनर्वसनासह नव्या बांधकामांना चालना देण्यात येत आहे. भोगवटा प्रमाणपत्र प्रलंबित इमारतींसाठी अभय योजना लागू करण्यात आली आहे. स्वयंपुनर्विकासासाठी अधिमूल्य कमी करण्यात आले असून, कामाठीपुरा येथील ३३९ इमारतींच्या पुनर्विकास प्रस्तावालाही टेंडर प्रक्रियेनंतर मंजुरी देण्यात आली आहे. तसेच मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी नवे धोरण जाहीर करून स्वयंपुनर्विकासाला चालना देण्यात आली असून, सध्या सुमारे १,६०० इमारतींचा पुनर्विकास या योजनेंतर्गत सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

**कायदा आणि सुव्यवस्था बळकटीकरणावर भर**

विधानसभेत गृह विभागावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील कायदा-सुव्यवस्थेची आकडेवारी सादर केली. ऑक्टोबर २०२४ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पुण्यात गुन्ह्यांची घट झाल्याची माहिती दिली. नवीन फौजदारी कायदे लागू झाल्यानंतर दोषसिद्धीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढून ९६.२४ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. डायल ११२ सेवेचा प्रतिसाद वेळ १५ मिनिटांवरून सुमारे ७.३७ मिनिटांपर्यंत कमी झाल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. महिला व बालकांवरील गुन्ह्यांबाबत बोलताना तक्रारींच्या नोंदीचे प्रमाण ९९ टक्क्यांहून अधिक असल्याचे सांगून महिलांवरील गुन्ह्यांमध्ये ६० दिवसांत चार्जशीट दाखल करण्याचा दर ऑक्टोबर २०२५ पर्यंत ८७.८ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ‘ऑपरेशन मुस्कान’ आणि ‘ऑपरेशन शोध’च्या माध्यमातून हजारो हरवलेल्या महिला व बालकांचा शोध घेण्यात आले आहे. अपहरणाच्या नोंद झालेल्या प्रकरणांपैकी राज्यात सुमारे ८६ टक्के व्यक्ती एका वर्षात सापडतात, तर मुंबईत हा दर ९९ टक्क्यांपर्यंत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सायबर गुन्हे, अमली पदार्थ आणि संघटित गुन्हेगारीविरोधातही कारवाई तीव्र केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ‘महासायबर’च्या माध्यमातून सायबर फसवणूक, फेक कॉल सेंटर्स आणि डिजिटल अरेस्टसारख्या गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यात येत असून महासायबर हे देशातील सर्वात आधुनिक सायबर हेडक्वार्टर ठरले आहे. अनेक राज्यांनी आणि दोन देशांनी सहकार्यासाठी विनंती केली आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. अमली पदार्थांविरोधात झिरो टॉलरन्स धोरण राबवले जात असून, पेडलर्सवर मोका व एमपीडीए अंतर्गत कठोर कारवाई केली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गेल्या दहा वर्षांत ८८ हजारांहून अधिक पोलिस भरती झाल्याची माहिती देत, गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहील, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तराचा समारोप करताना, महाराष्ट्र आता थांबणार नाही, सर्वांच्या सहकार्याने महाराष्ट्र आपल्याला पुढेच न्यायचा आहे, असे सांगितले.

राज्याचा विकास थांबणार नसल्याचे मुख्यमंत्र्यांचे विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावर प्रतिपादन

# महाराष्ट्राच्या अमृत महोत्सवाकडे वाटचाल करताना रचनात्मक कार्यासाठी एकत्र येऊया - मुख्यमंत्री फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी -** महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आजही देशातील सर्वाधिक सक्षम आणि स्थिर असून, सर्व आर्थिक निकषांवर राज्य पात्र ठरत आहे. कर्ज, राजकोषीय तूट, गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, सिंचन, वीज, दळणवळण आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात राज्याने भरीव काम केले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना सांगितले. राज्याची अमृत महोत्सवाकडे वाटचाल सुरू असताना पुढचा काळ महाराष्ट्रासाठी अत्यंत निर्णायक असल्याचे नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहातील सर्व नेत्यांना एकत्र येऊन रचनात्मक कार्यातून राज्याला वेगाने पुढे नेण्याचे आवाहन केले.

विधानसभेत नियम २९३ अन्वये मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सविस्तर आढावा मांडला. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर आलेल्या विविध आव्हानांना सामोरे जात निर्णयक्षम आणि समन्वयातून कारभार केल्याचे त्यांनी सांगितले.

कोविड काळ, विविध अडचणीं याचा उल्लेख करत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आता या सर्व गोष्टी मागे टाकून महाराष्ट्र पुढे नेण्याचा प्रयत्न राज्य शासन करत आहे. अमृत महोत्सवी महाराष्ट्र घडवण्याच्या दिशेने वाटचाल करताना सभागृहातील सर्वांनी रचनात्मक कामातून राज्याच्या प्रगतीसाठी एकत्र यावे. अमृत महोत्सवाकडे वाटचाल करताना सकारात्मकता आणि विकासकेंद्रित दृष्टिकोन आवश्यक असल्याचे नमूद करत अब आगे बढ़ चुका हूँ मैं अब पग नहीं रुकने वाले, असे म्हणत विकासाच्या मार्गावर राज्याची वाटचाल थांबणार नसल्याचा निर्धार मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

**मुंबई महाराष्ट्रातच राहिल**

मुंबईबाबत स्पष्ट भूमिका मांडताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, मुंबई महाराष्ट्राचीच होती, आहे आणि कायम राहील. संयुक्त महाराष्ट्र लढ्यात एकशे सहा हुतात्म्यांच्या बलिदानातून महाराष्ट्र घडला असून यासंदर्भात कुठलाही संभ्रम ठेवण्याची आवश्यकता नाही. छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवलेल्या मार्गावर, संविधानाच्या चौकटीत महाराष्ट्र चालत राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सीबीएसईच्या नव्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासाला २१ पानांचा सविस्तर समावेश करण्यात आल्याची माहिती देत त्यांनी केंद्र सरकारचे आभार मानले.

**२०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडविणार**

महाराष्ट्रासाठी तयार करण्यात आलेल्या व्हिजन डॉक्युमेंटचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या विकासासाचा रोडमॅप तयार करताना २०३०, २०३५ आणि २०४७ असे तीन टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडवण्याचे उद्दिष्ट असून २०२९-३० दरम्यान देशातील पहिली ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था महाराष्ट्राची असेल, या दिशेने काम सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**राज्य शासनाच्या योजना पुढील पाच वर्षेही चालणार**

राज्य शासनाच्या विविध योजनांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, 'लाडकी बहीण' योजना, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज यांसह सर्व योजना सुरू असून त्या पुढील पाच वर्षेही सुरू राहतील, असे ठामपणे त्यांनी सांगितले.

**राज्याची आर्थिक स्थिती मजबूत**

राज्याची आर्थिक स्थिती मजबूत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशातील मोठ्या राज्यांचा विचार केल्यास आजही सर्व निकषांवर महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पात्र ठरते. राज्याच्या विकासासाठी कर्ज उभारणे आवश्यक असते आणि राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या २५ टक्क्यांपर्यंत कर्ज उभारण्याची परवानगी असताना, केवळ १८.८७ टक्के कर्ज घेतले आहे. राजकोषीय तूटही (Fiscal Deficit) तीन टक्क्यांच्या आत राखण्यात यश आले असून, लाडकी बहीण योजना आणि शेतकऱ्यांना मदत देऊनही हे शक्य झाले. कॅगने घालून दिलेल्या तिन्ही आर्थिक अटी पूर्ण केल्या असून, केंद्र सरकारने घालून दिलेल्या निकषांपेक्षा जास्त भांडवली गुंतवणूक महाराष्ट्राने केली आहे.

**गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर**

महाराष्ट्र राज्याने उद्योग, गुंतवणूक, रोजगार निर्मिती, ऊर्जा, कृषी आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केली असून देशात सर्वांगीण विकासाचा आदर्श उभा केला आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र खूप पुढे गेला असून, केवळ सामंजस्य करार नाही, तर त्यांची अंमलबजावणी होत आहे. दावोसमध्ये झालेल्या १७ लाख ५७ हजार ८०१ कोटी रुपयांच्या करारांपैकी ७५ टक्के करारांची अंमलबजावणी सुरू झाली आहे. विदेशी थेट गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात अव्वल असून, २०२४-२५ मध्ये विक्रमी १ लाख ६४ हजार ७७५ कोटी रुपयांची गुंतवणूक आली. देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ३१ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. २०२५-२६ मध्ये आतापर्यंत ९१,३३७ कोटी रुपये एवढी परकीय थेट गुंतवणूक महाराष्ट्रामध्ये आलेली आहे.

**विदर्भ व मराठवाड्यात गुंतवणुकीचा ओघ**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विदर्भात इलेक्ट्रॉनिक्स, संरक्षण, स्टील आणि कोल गॅसिफिकेशनमध्ये मोठी गुंतवणूक येत आहे. मराठवाडा 'ईव्ही कॅपिटल' म्हणून विकसित होत आहे, ज्यात टोयोटा, स्कोडा, एथर यांसारख्या मोठ्या ब्रँड्सची गुंतवणूक झाली आहे. मिहानमध्ये ३१ कंपन्या कार्यरत असून नवीन २२ कंपन्या सुरू होत आहे. यातून १ लाख २७ हजार लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. अमरावती विमानतळावर एशियातील सर्वात मोठी हवाई प्रशिक्षण संस्था सुरू होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**गडचिरोली जिल्हा ठरणार गुंतवणुकीचा नवीन मॅग्नेट**

गडचिरोली जिल्हा हा एक गुंतवणुकीचा नवीन मॅग्नेट तयार झालेला आहे. सर्वाधिक गुंतवणूक आता गडचिरोलीमध्ये येत आहे. अवकाश आणि संरक्षण साहित्य निर्मिती क्षेत्रामध्ये विदर्भामध्ये २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. त्यातून दहा ते पंधरा हजार रोजगार होणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि निर्मिती, सेमीकंडक्टर, सोलर पॅनल आणि मॉड्यूल याच्यामध्ये १,५५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक आलेली आहे. त्यातून ६५ हजार प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. कोल गॅसिफिकेशनची सर्वात मोठी गुंतवणूक विदर्भात आली असून सोलरमध्येही विदर्भ प्रथम क्रमांकावर राहणार असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

**बीकेसीच्या धर्तीवर नवीन नागपूरची निर्मिती केली जाणार**

नागपूरमध्ये बीकेसीच्या धर्तीवर 'नवीन नागपूर' (आयबीएफसी) ची निर्मिती केली जाईल, जिथे ५ लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्मिती अपेक्षित असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मराठवाड्यात सुमारे ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली आहे. त्यातून सुमारे ४० हजार रोजगार निर्मिती झाली आहे. याशिवाय महाराष्ट्राच्या पुणे, सातारा, कोल्हापूर या भागातही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत आहे.

**रोजगार निर्मिती**

रोजगार निर्मितीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, मिहानमध्ये आयटी क्षेत्रातील 'बिग सिक्स' पैकी सहाही कंपन्या कार्यरत असून, १ लाख २७ हजार २२५ लोकांना अप्रत्यक्ष रोजगार प्राप्त झाला आहे. 'महाभरती' उपक्रम सुरू करून तीन वर्षांमध्ये १ लाख २० हजार शासकीय नोकऱ्या दिल्या असून, पुढील दोन वर्षांत तेवढ्याच नोकऱ्या देण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांसाठी भरघोस मदत**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांसाठी घोषित केलेल्या ३२ हजार कोटी रुपयांच्या पॅकेजपैकी १५ हजार ७ कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. रब्बी हंगामासाठी जाहीर केलेली १० हजार रुपयांची अतिरिक्त मदत ९१ लाख शेतकऱ्यांना मिळाली आहे. कापूस खरेदीमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून सरासरी उत्पादकता १२७७ किलो प्रति हेक्टरवरून २,३६८ किलो प्रति हेक्टर करण्याचा निर्णय घेतला आहे.

कर्जमाफीच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला असून, कर्जमाफीचा फायदा थेट शेतकऱ्यालाच व्हावा, बँकांना नव्हे, यासाठी समिती स्थापन केली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर १ जुलैपर्यंत कर्जमाफीची योजना व धोरण निश्चित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**ऊर्जा क्षेत्रात मोठे बदल**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी राज्य शासन २६ हजार ६८१ कोटी रुपये खर्च करत आहे. तसेच, एशियातील सर्वात मोठा १६,००० मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प महाराष्ट्रात सुरू आहे. यामुळे २०३० पर्यंत महाराष्ट्राची ५२ टक्के ऊर्जा हरित स्रोतांवर आधारित असेल. पीएम कुसुम योजनेत देशात स्थापित झालेल्या ११.९० लाख सौर पंपांपैकी ७ लाख ३८ हजार पंप एकट्या महाराष्ट्रात आहेत आणि एका महिन्यात ४५ हजार ९११ पंप लावून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे.

ग्रीड स्टॅबिलाईज करण्यासाठी आवश्यक असलेल्या पंप स्टोरेजच्या निर्मितीसाठी महाराष्ट्रात ७६,००० मेगावॅटचे करार झाले आहेत. पुढील सहा महिन्यांत १ लाख मेगावॅट क्षमता निर्मितीचे लक्ष्य आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पामध्ये ७.५ लाख शेतकऱ्यांचा फायदा होणार आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोनच्या कामाची सुरुवात झाली आहे. या वर्षीसाठी ३५१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**विदर्भ व मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष कमी करण्यात यश**

विदर्भ आणि मराठवाड्यातील १३ लाख ८३ हजार हेक्टरचा सिंचन अनुशेष जवळपास संपुष्टात आला आहे, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, इंडिकेटर बॅकलॉग समितीने निश्चित केलेल्या या अनुशेषापैकी १३ लाख ३४ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात आले असून, आता केवळ ४९ हजार हेक्टरचा अनुशेष शिल्लक आहे. हा अनुशेष प्रामुख्याने अकोला, बुलढाणा आणि हिंगोली या तीन जिल्ह्यांपुरता मर्यादित आहे. अकोल्यात उर्वरित १४,५३० हेक्टरच्या अनुशेषाच्या बदल्यात २०२६-२७ पर्यंत १९,३३५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार असून, बुलढाण्यात २९ हजार हेक्टरच्या अनुशेषाविरुद्ध १ लाख ६८ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. विशेषतः झीगाव प्रकल्पासाठी यंदा २,३९९ कोटींची तरतूद करण्यात आली असून, या एका प्रकल्पामुळे बुलढाणा जिल्हा अनुशेषातून थेट अधिशेषात जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पूर्व विदर्भाची जीवनरेखा मानल्या जाणाऱ्या गोसीखुर्द प्रकल्पाचे वाढीव काम अंतिम टप्प्यात असून, एकूण २.५४ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. त्यासाठी १,५५५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून, जून २०२७ पर्यंत काम पूर्ण होणार आहे. विदर्भात एकूण ४८५ सिंचन प्रकल्पांपैकी बहुतांश पूर्ण झाले असून, उर्वरित ७४ प्रकल्पांतून ७.६६ लाख हेक्टर अतिरिक्त क्षमता तयार होणार आहे. याशिवाय १ लाख कोटींच्या वैनगंगा-नळगंगा महाप्रकल्पामुळे ४.०४ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असून, फेब्रुवारी २०२६ पर्यंत सर्व मान्यता प्रक्रिया पूर्ण होण्याचे लक्ष्य आहे. मराठवाड्यासाठी दमणगंगा-नारपार-गिरणा पाणी वळवणे तसेच कोल्हापूर-सांगलीतील पुराचे पाणी उजनीपर्यंत नेणाऱ्या फ्लड डायव्हर्जन प्रकल्पांमुळे दुष्काळ कायमचा दूर होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**कनेक्टिव्हिटीवर भर**

नागपूर-गोवा शक्तिपीठ द्रुतगती महामार्गामुळे प्रवासाची वेळ आठ तासांवर येणार असून या महामार्गामुळे मराठवाड्याचे चित्र पालटणार आहे. तसेच नवीन प्रस्तावित मुंबई-कल्याण-लातूर जन कल्याण द्रुतगती महामार्ग जाहीर करण्यात आला आहे. यामुळे लातूर ते मुंबई प्रवास केवळ ४.५ तासांवर येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्यात मेट्रो आणि पायाभूत सुविधांच्या कामांना गती देण्यात आली असून सध्या मुंबईत ९१ किलोमीटर लांबीची मेट्रो सेवा कार्यरत आहे. या मार्गांवरून दररोज सुमारे ९ लाख ५० हजार प्रवासी प्रवास करत आहेत. पुढील दोन वर्षांत या कार्यरत लांबीमध्ये आणखी १३२ किलोमीटरची भर पडणार असून पुण्यात ३३ किलोमीटर मेट्रो मार्ग सुरू असून त्याचा लाभ दररोज २.२३ लाख प्रवासी घेत आहेत. पुण्यात आणखी ४५ किलोमीटरचे काम प्रगतीपथावर असून त्यातील २७ किलोमीटर पुढील दीड वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. नागपूरमध्ये ४० किलोमीटर मेट्रो मार्ग पूर्ण झाला असून रोज १.१० लाख प्रवासी त्याचा वापर करत आहेत, तर ४३ किलोमीटरचा नवा टप्पा पुढील दोन वर्षांत पूर्ण केला जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईतील इतर महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांनाही वेग देण्यात आला आहे. ऑरेंज गेट ते मरीन ड्राइव्ह भुयारी मार्ग, उत्तर सागरी किनारा मार्ग, वांद्रे ते वर्सोवा, वर्सोवा-दहिसर आणि दहिसर-भाईंदर रस्ता यासह भाईंदर उत्तर ते विरार सागरी मार्गाला मान्यता देण्यात आली आहे. ठाणे-बोरिवली भुयारी मार्ग, गोरेगाव-मुलुंड लिंक रोड, उलवे सागरी किनारा मार्ग, अटल सेतू इंटरचेंज तसेच 'मिसिंग लिंक' प्रकल्पांचे काम अंतिम टप्प्यात आहे. याशिवाय पुण्याच्या चक्राकार मार्गाच्या कामालाही सुरुवात करण्यात आली असून, या सर्व प्रकल्पांमुळे राज्यातील शहरी वाहतूक व्यवस्था अधिक गतिमान होण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

'अमृतकाल रस्ते योजने'अंतर्गत रस्त्यांचा दर्जा, वाहतूक, मुख्य केंद्रांशी जोडणी यांचा विचार करून योजनेनुसार रस्ते विकास केला जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. समृद्धी महामार्गाच्या विस्ताराअंतर्गत नागपूर-गोंदिया १६२ कि.मी. द्रुतगती महामार्गासाठी १८,५३९ कोटी रुपयांचा प्रकल्प अंतिम टप्प्यात असून, जमीन संपादन पूर्ण होताच नागपूरहून गोंदियाचा प्रवास **पान ३ वर**




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.